# SMP & SMLA REPORT



# ***MAHARASHTRA***









**_SMP- SOL GEETA_**

Stones Mahila Police Officer’s Memorial Kamgiri, Uttar Pradesh Madhya Pradesh Product Factory Disrupted 28crores illegal drugs and seized by police




ठाणे: ठाणे महिलापोलीस अधिकाऱ्याची उल्लेखनीय कामगिरी,उत्तर प्रदेश मधील एमडी पदार्थाची फॅक्टरी उध्वस्त करत28कोटीचा मुद्देमाल जप्

**_SMP- SOL ASHA_**

**_Sindhudurg_**

Kudal: “Ply 91” airline starts service from Sindhudurg to Bangalore from Sindhudurg Airport: 75 seat first aircraft departs.




कुडाळ: सिंधुदुर्ग विमानतळावरून "प्लाय् 91" विमानकंपनीची सिंधुदुर्ग ते बंगळुरू सेवा सुरु : ७५ सीट असलेल पहिल विमान रवाना

RAIGAD

# New rail link between Thane & Raigad to be explored amid rise in population

Manoj Badgeri / TNN / Updated: Feb 20, 2024, 21:52 IST



File photo

Union minister Kapil Patil announced plans for a new rail connection between Thane and Raigad. The proposed link between Badlapur and Navi

**SMP- SOL ROSHNI**

SATARA

## पुण्यातून 'त्यांनी' आणला साताऱ्यापर्यंत गुटखा; पण एका चुकीमुळे अडकले सापळ्यात



**सातारा प्रतिनिधी ।** सातारा पोलिसांच्यावतीने सोमवारी अवैध गुटखा वाहतूक प्रकरणी एक मोठी कारवाई करण्यात आली. पुण्यातून साताऱ्यात कारमधून गुटख्याची तस्करी करणाऱ्या पुण्यातील दोघांना सातारा शहर पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरणच्या कर्मचाऱ्यांनी अटक केली. त्यांच्याकडून १ लाख २५ हजारांचा गुटखा आणि एक कार, असा सुमारे ६ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करण्यात आला आहे.

## कालव्यातून पाणी उपसा प्रतिबंधासाठी कलम 144 लागू

**सातारा प्रतिनिधी ।** सध्या सातारा जिल्ह्यात कोरेगाव, माण, खटावसह काही भागात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत या तालुक्यात समन्यायी पद्धतीने सिंचनासाठी आवश्यक पाणी विसर्ग पोहचण्यासाठी अडचण निर्माण होणार असल्याचे लक्षात घेत सिंचन विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्याकडे तालुक्यातील कालव्याच्या दोन्ही बाजूला आवश्यकतेनुसार ३० मीटर ते ५० मीटर अंतरावर कलम १४४ आदेश लागू करण्याची मागणी सातारा सिंचन विभागाकडून करण्यात आली होती. त्याला अनुसरून कार्यवाही करत संबंधित तालुक्यातील तहसीलदारांमार्फत कालव्याच्या दोन्ही बाजूला गरजेनुसार तीस मीटर ते पन्नास मीटर अंतरापर्यंत कलम १४४ प्रमाणे अनधिकृत पाणी उपसा प्रतिबंधक मनाई आदेश जारी करण्यात आला आहे.




**हॅलो कृषी ऑनलाईन :** यंदा राज्यातील सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी (Cabinet Decision) अपुऱ्या पावसामुळे उत्पादन घटीचा फटका सहन केला. त्यातच गेले वर्षभर दोन्ही पिकांना मातीमोल दर मिळत होता. ज्यामुळे राज्यात सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सरकारविषयी रोषाची भावना होती. शेतकऱ्यांचा हा रोष काहीसा कमी करण्याचा प्रयत्न राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी राज्यातील शिंदे भाजप सरकारने काही निर्णय घेतले आहे. त्यात राज्यातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी 4 हजार कोटींची घोषणा करण्यात आली आहे.

**SMP- SOL PRATIK**

**AMRAVATI**




धामणगाव रेल्वे: बेलोरा शेतशिवारात रेतीचोरांवर तळेगांव दशासर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल



अमरावती: ५ ते ६ लक्ष रुपये चा अवैध प्लास्टीकचा साठा जप्त,महानगरपालिका पथकाची धडक कारवाई

**SMP- SOL KAVITA**

**JALNA**

लोकमत

नळ योजनेच्या दुरुस्तीसाठी टंचाई निधी मंजूर

# जिल्ह्यातील ११० गावांच्या पाणीपुरवठा योजनांना संजीवनी; दुरुस्तीसाठी ५ कोटींचा निधी मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** पाणीटंचाई निवारण्यासाठी जिल्ह्यातील ११० गावांच्या नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्त करण्यात येणार आहेत. यासाठी प्रशासनाकडून ५ कोटी ५१ लाखांच्या तातडीच्या निधीस मंजुरी देण्यात आलेली आहे.

आचारसंहिता लागू करण्यात आली असली तरी, पाणीपुरवठ्याची कामे अत्यावश्यक सेवेत येत असल्याने योजनांची कामे सुरु करण्यात कुठलाही अडथळा नाही. टंचाई असणाऱ्या गावांमध्ये दुरुस्तीची कामे तातडीने करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आहेत. या मंजुरीमुळे पाणीटंचाईवर मात करण्यास मोठी मदत होणार आहे.

## सर्वाधिक गावे अंबड तालुक्यातील

- दुरुस्तीअभावी रखडलेल्या सर्वाधिक नळ योजना या अंबड तालुक्यातील आहेत. या तालुक्यातील ३१ गावांच्या नळ योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे
- तसेच परतूर तालुक्यातील ३, मंठा-२१, जाफराबाद १९, जालना- १, बदनापूर - १५, घनसावंगी-११ अशा ११० गावातील नळ योजनांच्या दुरुस्तीस निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.




जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये धरण तलावांमध्ये पाणीसाठी अत्यंत कमी शिल्लक राहिल्यामुळे पाणी उपलब्ध असणाऱ्या विहिरींचे अधिगृहीत करण्यात येत आहे. अधिगृहीत विहिरीतून पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी अनेक गावांना निधीची गरज आहे. प्रशासनाने मंजूर केलेल्या निधीतून नळ योजनेच्या पाणी पुरवठ्याची कामे करण्यात येणार आहेत. नागरिकांना पाणी मिळण्यासाठी तातडीने काम सुरु करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आलेल्या आहेत.



## नळ योजना दुरुस्तीसाठी निधी

१ मागील वर्षी आलेल्या कमी पावसामुळे यंदा दुष्काळाचा सामना जिल्ह्यातील नागरिकांना करावा लागत आहे.

२ पाणी टंचाईचा त्रास कमी करण्यासाठी जिल्ह्यातील विविध गावांच्या नळ योजना दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

३ नळ योजना दुरुस्त करून नागरिकांना पाणी मिळण्यासाठी निधीस मंजुरी देण्यात आली आहे.

लोकमत

# अवैध दारूच्या शोधासाठी तीन भरारी पथके स्थापन

## दारूच्या दुकानात सीसीटीव्ही लावणे गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**जालना :** लोकसभा निवडणुकीच्या काळात अवैध दारूविक्रीला पायबंद लावण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून तीन भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच दारूविक्री करणाऱ्या प्रत्येक दुकाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांनी दिली.

निवडणूक काळात मद्याचे आमिष दाखवण्यात येते. यासाठी मोठ्या प्रमाणात अवैध दारूचा वापर होत असतो. याप्रकाराला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे.

१६ मार्चपासून लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर उत्पादन शुल्क विभाग अलर्ट झाला आहे. यामुळे अवैध दारूविक्री करणाऱ्यांनाही चाप बसणार असून, कारवाईचा फास आवळला जाणार आहे.

## पंधरा दिवसांत १८० गुन्हा

- १ जानेवारी ते १६ मार्च २०२४ या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारूची विक्री व वाहतूक केल्याप्रकरणी १८० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
- याप्रकरणी १४७ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच ७ वाहनेदेखील जप्त करण्यात आलेली आहेत. या कारवाईत १७ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

***ALL GLORY TO GOD***